VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# प्रत्यक्षवादी इतिहास लेखनाचे महत्व

**प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला व
वाणिज्य महाविद्यालय नागपूर

सारांश:-

*इतिहास लेखन पद्धतीत काळानुरूप अनेक बदल झालेत. इतिहासाच्या स्वरूपात व व्याप्तीतही वेळोवेळी बदल झालेत. इतिहास लेखनात अनेक प्रवाहांचा उदय होत गेला परंतु इतिहास लेखनाचा चेहरा-मोहराच बदलून टाकणाऱ्या प्रत्यक्षवादी इतिहास लेखन प्रवाहाचे महत्व यामध्ये अनन्य साधारण आहे. या लेखन प्रवाहाने इतिहास लेखनात भौतिक शास्त्रीय पद्धतीचा आग्रह धरला. इतिहासाला शास्त्रीय ज्ञान शाखेचा सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. इतिहास लेखनात व संशोधनात सत्यशोधन, वस्तुनिष्ठता, एतिहासिक स्त्रोत साधनांचे शास्त्रीय पद्धतीने संकलन व निवड, साधनांचे परिक्षण, कारणमीमांसा, अन्वयार्थ, प्रस्तुतीकरण, तळटीपा, संदर्भ सूची आणि वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्यावर जोर दिला जाऊ लागला. थोडक्यात इतिहास लेखनाला शास्त्रीय आधार देण्यावर भर दिला गेला.*

***बीज शब्द:-*** *प्रत्यक्षवाद, प्रत्यक्षवादाचे स्वरूप, प्रत्यक्षवादी इतिहासकार, ऑगस्ट कॉम्त, लियोपाल्ड रांके, प्रत्यक्ष वादावरील आक्षेप व योगदान.*

**प्रास्तविक:-**

ग्रीक संस्कृतीत सुरू झालेली राजकीय इतिहास लेखनाची परंपरा काही काळाने सर्वच संकृत्यांमध्ये प्रसारित झाली. प्रत्येक संस्कृतीचे इतिहास लेखनाचे आप- आपली वैशिष्ट्ये होती. मध्ययुगातही इतिहास लेखन पद्धतीत वेळोवेळी बदल होत राहिले. आधुनिक काळात मात्र औद्योगिक क्रांतीनंतर लेखन पद्धतीत क्रांतिकारक बदल होत गेले. मध्ययुगीन नियत वात किंवा दैववाद इतिहास लेखनातून दूर होऊन; त्याची जागा शास्त्रीय इतिहास लेखन पद्धती घेऊ लागली. इतिहास लेखनात शास्त्रीयतेचा आधार घेतला जावा हा विचार पुढे येऊ लागला. इतिहासाला उच्च दर्जा प्राप्त करून द्यावयाचा असेल तर इतिहास लेखनातही शास्त्रीय पद्धतीचा उपयोग केला जावा हा विचार पुढे आला. प्रा. गफुर शेख लिहितात," याच काळात इतिहासाला शास्त्रीय आधार देऊन इतिहासाचा अन्वयार्थ काढला पाहिजे असे ऑगस्ट कॉम्त यास वाटू लागले म्हणून त्याने इतिहासाच्या शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यास सुरुवात केली."[1]

ऑगस्ट कॉम्तने शास्त्रीय दृष्टिकोनावर आधारलेली प्रत्यक्षवादी इतिहास लेखनाची परंपरा पुढे आणली. त्यामुळे या पूर्वीच्या इतिहास लेखनातील दैववाद, नियतवाद, स्त्रोत साधनांचा अभाव, चिकित्सक दृष्टी चा अभाव आणि इतिहास लेखनातील प्रशिक्षणाचा अभावामुळे सत्याचा भक्कम आधार नव्हता. काळाच्या परिवर्तनशीलतेच्या विचाराचा अभाव होता. डॉ. शांता कोठेकर लिहितात ," त्यामुळे इतिहासात भूतकाळाचे वास्तव चित्रण होत नव्हते. प्राथमिक स्त्रोत साधने अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध नव्हती. त्यामुळे इतिहास लिहिण्यासाठी बव्हंशी दुय्यम साधनांचा वापर होत असे. तसेच विद्यापीठातून इतिहासाच्या अध्ययनाची निश्चित पद्धती, शिकवण्याचा शिरस्ता नव्हता त्या विषयाचा गंभीरपणे अभ्यास होत नव्हता."[2] इतिहासाकडे पाहण्याची भूमिका गौण होती. इतिहासात नवीन भूमिका समोर आली. इतिहास लेखनात," तर मूळ स्त्रोत साधनांची चिकित्सक छाननी करून ऐतिहासिक सत्य शोधून काढण्यावर लक्ष केंद्रित करणारा इतिहासकारांचा एक गट पुढे सरसावला."[3] या दृष्टीकोनाची बार्थोल्ड याने समर्थन केले.

**प्रत्यक्षवादी इतिहास लेखन प्रवाहाचा उदय:-**

प्रत्यक्षवाद म्हणजे काय? याविषयी प्रा. गफुर शेख लिहितात," सत्य प्रियता व वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आणि ऐतिहासिक पुरावे यांच्या आधारे वस्तुनिष्ठ सत्याचे त्याच स्वरुपात केलेले यथार्थवादी वर्णन म्हणजे प्रत्यक्षार्थवाद ( प्रत्यक्षवाद) होय."[4]

ऑगस्ट काम यांनी इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासाला पहिल्यांदा सुरुवात केली जर्मन तत्त्वज्ञ लिओ रांके याने प्रत्यक्ष वादी विचार प्रणाली इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित केली बुद्धीजीवीना शास्त्रीय पद्धतीने प्रभावित केले होते त्यामुळे इतिहासाचीही याच पद्धतीने अध्ययन केल्यास सत्याचे दर्शन करता येईल असे बुद्धिवंतांना वाटू लागले भौतिकशास्त्रज्ञ वापरतात त्या शास्त्रीय पद्धतीचा वापर इतिहासकारांनी केल्यास सत्य शोधले जाईल सत्यशोधन करणे ही प्रत्यक्ष वादी तत्वज्ञानाचा प्रमेय होय. त्यामुळे,'' अंत: हम यह स्वीकार कर सकते है कि निरीक्षण, परीक्षण, अवलोकन, प्रयोग और वर्गीकरण ही प्रत्यक्षवाद के मुख्य आधार है!"[5]

प्रत्यक्ष वाद निश्चित, नि:संदिग्ध, वादातीत स्वरूपाचे ज्ञान होय असे म्हटले जाते. शास्त्रीय पद्धती द्वारे सत्य शोधणे हा त्याचा उद्देश आहे. त्यामुळे इतिहासाला शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. इतिहास लेखनात

स्रोत साधनांचा वापर, त्याचे परीक्षण, सामान्यीकरण, कार्यकारणभाव, बुद्धिवाद व विवेक वादाच्या वापराला इतिहासलेखनात महत्त्व दिले गेले.

**प्रत्यक्षवादाचे स्वरूप:-**

प्रत्यक्षवादी इतिहास लेखनात बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला गेला. घटना कशा घडतात ? घटनांमागील संबंध स्पष्ट करण्यावर जोर दिला जातो. प्रत्येक ऐतिहासिक घटनांमागील कारण परंपरा शोधण्याला महत्त्व दिले जाते. घटनेच्या घडनेमागील प्रक्रिया विचारात घेतली जाते. स्रोत साधनां वरच इतिहास लेखनाचा आग्रह धरला जातो. स्रोत साधनांचे संकलन व निवडीच्या प्रक्रियेत शास्त्रीय पद्धती ला स्वीकारण्याचा आग्रह धरला जातो. अन्वयार्थ काढताना शास्त्रीय पद्धतीचा वापर करण्यात यावा. निष्कर्ष सुद्धा शास्त्रीय पद्धतीनेच काढण्यावर भर दिला जातो. प्रा. गफुर शेख लिहितात," ऐतिहासिक घटना समजून घेण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला जाऊ लागला. नियम व सामान्यीकरण या संकल्पना इतिहासामध्ये अस्तित्वात आल्या."[6]

इतिहासात भूतकालीन घडामोडींचे सत्य लेखन करण्यावर जोर दिला जाऊ लागला. गतकालीन घटनांचा अन्वयार्थ काढून अचूक निष्कर्ष काढण्यावर लक्ष दिल्या गेले यामुळे इतिहासाला वस्तुनिष्ठ स्वरूप प्राप्त होऊ लागले.

**प्रत्यक्षवादी इतिहासकार:-**

प्रत्यक्षवादी इतिहासकार म्हणून ऑगस्ट कॉम्त आणि जर्मन तत्त्वज्ञ लिओपाल्ड रांके यांचे नाव घेतले जाते.

**अ) ऑगस्ट कॉम्त:-** प्रत्यक्ष वादी इतिहास लेखन प्रवाहाचा विचार सर्वप्रथम ऑगस्ट कॉम्त यांनी मांडला. भौतिक शास्त्रप्रमाणे इतिहास लेखनात शास्त्रीय पद्धतीचा उपयोग केल्यास भौतिक जगातील व्यवहाराचे अज्ञान दूर होईल. नैसर्गिक शक्तीच्या संचालनाचे रहस्य समजता येईल. त्यामुळे या शास्त्रीय पद्धतीने प्रभावित होऊन मानवी जीवनाचे अध्ययन ऑगस्ट कॉम्त करू लागला. यालाच पॉझिटिविझं म म्हटले जाते. ऑगस्ट कॉम्त यांच्या मते," शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ज्या प्रमाणे विश्वाच्या संचालना मागील कायमस्वरूपी नियम शोधून काढता येतात त्याच पद्धतीचा वापर करून गतकालीन मानवी जीवनाचे अध्ययन करता येईल आणि त्यासंबंधी सर्वसामान्य नियम शोधून काढता येतील त्यासाठी गतकालीन घटनांचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून व त्यांच्यातील आंतरिक संबंध शोधून काढून मानवी जीवनाबाबत सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात अशी त्याची (कॉम्त) ठाम भूमिका होती."[7]

इतिहास अध्ययनात गतकालीन सत्य घटना शोधण्या सोबतच त्या घटनांमागील आंतरिक सूत्र शोधून काढावे. त्यात सर्वसामान्य नियम शोधावेत. मानवी व्यवहाराचे नियमन करणाऱ्या सूत्रांचा शोध लागल्यास मानवी जीवनाला दिशा देता येईल. डॉ. सातभाई लिहितात,'' इतिहास हे मानवशास्त्र असल्यामुळे शास्त्राचे नियम पूर्णपणे इतिहासाला लागू करता येत नसले तरी निरीक्षण, चिकित्सा, विश्लेषण, सत्या सत्याचा निर्णय या पद्धतीचा वापर करून इतिहासात देखील सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात,"[8].

निसर्गात घटित घटना मागील कारणांचा शोध हा शास्त्रीय पद्धतीने घेतला जातो. अज्ञात घटनांमागील कारण शोधले जाते. कार्यकारणभाव स्थापित केला जातो ऑगस्ट कॉम्त यांच्या मतानुसार," निसर्गातील घटनांमध्ये एक प्रकारची शिस्त असते. घटनाक्रम ठरलेला असतो. तशाच प्रकारच्या घटना व शिस्त मानवी समाजामध्ये असते. त्याचा अभ्यास करून त्याच्या जोरावर इतिहासामधील घटनांचा अभ्यास केल्यास त्या विषयाला शास्त्रशुद्ध पाया लावेल अशी कॉम्त ची भूमिका आहे,"[9]

ऑगस्ट कॉम्त ने समाजाच्या विकासाच्या तीन अवस्था सांगितल्या. त्यांच्या मतानुसार ईश्वर शास्त्रीय अवस्था, सदवस्तू शास्त्रीय व्यवस्था आणि प्रत्यक्षार्थी अवस्था या होत. पहिल्या अवस्थेत व्यक्ती दैववादी होता. दुसऱ्या अवस्थेत तो कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करु लागला तर तिसऱ्या अवस्थेत घटनांमागील संबंध निरीक्षण पद्धतीने शोधू लागला. कार्यकारण भाव स्थापित करू लागला. थोडक्यात, भूतकालीन घडामोडीचे त्यांने वस्तुनिष्ठ दर्शन घडवावेत, विज्ञाना प्रमाणे इतिहासात सुद्धा वस्तुनिष्ठता असते तसेच इतिहासाला सुद्धा नियम असतात हे ऑगस्ट कॉम्त यांनी दाखवून दिले.

नैसर्गिक घटना प्रमाणे सामाजिक घटनांमध्ये निश्चित नियमांनी घटना घडत . असतात. प्रत्यक्ष वादी सिद्धांतानुसार,'' इसके परिणाम स्वरूप ऐतिहासिक खोजसे संबंध नवीन पद्धती यो का उदय हुवा जिसके कारण इतिहासकरोने यथार्थ तथ्यो को संकलन करने के पश्चात उन्हे सृंखलाबद्ध किया और अतित का सजीव चित्र प्रस्तुत किया!,"[10]

प्रत्यक्ष वादी इतिहास लेखन प्रवाहाने इतिहासाला वास्तववादी आणि शास्त्रीय दृष्टिकोन दिला. याचाच अर्थ प्रोफेसर ब्युरी यांनी म्हटल्याप्रमाणे,' इतिहास विज्ञान आहे त्यापेक्षा कमी किंवा अधिक नाही' हा विचार समर्थनीय वाटू लागतो.

**ब) लियोपाल्ड रांके:-** प्रत्यक्षवादी इतिहास लेखनाची मुहर्त मेट पद्धतशीरपणे रोवनारा रांके हा होय. त्याने इतिहासात संदर्भ साधनांचे वर्गीकरण केले. आज इतिहासाला चे महत्व प्राप्त झाले आहे त्याला रांके जबाबदार आहे. त्याने आधुनिक इतिहास लेखन शास्त्राचा पाया घातला आहे. रांकेने," इतिहास लेखनामध्ये वस्तुनिष्ठता असली पाहिजे असा त्याचा पहिल्यापासून आग्रह असे. इतिहास लेखनामध्ये संदर्भ साधनांची टिकात्मक परिक्षण ही फार आवश्यक बाब आहे असा मुद्दा त्याने पहिल्यांदा उपस्थित केला,"[11]

रांके ने वस्तुनिष्ठतेला फार महत्त्व दिले. त्यांच्या मतानुसार घटना जशाच्या तशा सादर व्हायला पाहिजे. त्यात नीती किंवा उपदेश नसावा. निष्पक्ष मूल्यमापन करण्यात यावे. लिओ पाल्ड रांकेने अनेक संशोधकांना एकत्र आणून इतिहास लेखन सुधारण्याकरिता अनेक चर्चांचे आयोजन केले. इतिहास लेखनात सत्याचा आग्रह धरला. इतिहासाला दैववादतून बाहेर

काढून शास्त्रीय ज्ञान शाखेचा दर्जा मिळवून दिला. रांके ने," इतिहास विषय महाविद्यालय/विद्यापीठे यांच्या पातळीवर शिकवण्याचा मोठा आग्रह त्याने धरला. बर्लीन विद्यापीठात इतिहास विषयावर परिसंवाद घेण्याची पद्धत त्याने सुरू केली. अनेक विचारवंत व संशोधकांना एकत्र आणले त्यांच्या विचारांचे आदान-प्रदान यानिमित्ताने होत राहिले. त्यामुळे इतिहास लेखन हे जास्तीत जास्त चांगले शास्त्रीय बनेल याचा विचार केला गेला,"[12]

रांके ने इतिवृत्त पेक्षा ऐतिहासिक व्यक्तींची कागदपत्रे अधिक विश्वसनीय मानलीत. इतिहास लेखनात इतिहास ग्रंथांचा वापर करताना लेखकाने व्यक्तित्व तपासण्या बरोबरच इतिहास लेखकाने मिळवलेल्या माहितीची मुळे शोधावी त्याची छाननी करावी याला रांके अतिशय महत्त्व देतो. रांके साधनांच्या यादी बरोबरच साधनांच्या चिकित्सक प्रक्रियेविषयी सुद्धा माहिती देतात. इतिहास लेखनात वापरलेल्या दुय्यम साधनांच्या परीक्षणाची पण माहिती देतो. रांके कल्पना व गुढ वाद ताज्य मानून पुराव्यातून जे सत्य हाती आली तेच दर्शविणे हे तो इतिहासकाराचे पवित्र कर्तव्य मानतो"[13]

**इतिहास लेखनाबाबत रांकेची तत्वे :-**

रांके ने इतिहास लेखनाथ शास्त्रीयतेवर भर देताना स्त्रोत साधनांच्या परीक्षणाला व चिकित्सेला फार महत्व दिले. या भूमिकेमुळे इतिहास तर्कसंगत व विश्वसनीय साधनांवर पुराव्यानिशी केलेली शास्त्रीय मांडणी ठरली. रांके ची इतिहास लेखनाबाबत ची काही तत्वे होती. रांके ऐतिहासिक विषयांवरील लिखित ग्रंथांना दुय्यम स्थान देतो. या ग्रंथाचे परीक्षण करताना तो कोणी, केव्हा व का ? लिहिला याचे परीक्षण करूनच त्यातील मते ग्राह्य मानावी असे म्हणतो. तो समकालीन मूळ स्त्रोत साधनाला महत्त्व देतो. रांके सत्य दर्शनावर जोर देतो एवढेच नाही तर आत्मनिष्टे एवजी वस्तुनिष्ठतेला अधिक महत्त्व देतो. गतकाळाचे जसेच्या तसे लेखन करण्यावर बल देतो. रांके ऐतिहासिक लिखाणात संदर्भ, तळटीपा, संदर्भ सूची यांनाही महत्त्व देतो. त्याने इतिहासाला दैववादा पासून दूर करून शास्त्रीय ज्ञान शाखेचा दर्जा मिळवून दिला.

रांके **च्या प्रत्यक्ष वादावरील काही आक्षेप :-**

रांके ने इतिहासाला शास्त्रीय ज्ञान शाखा असा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याने वस्तुनिष्ठतेवर अवास्तव भर दिला त्यावर काही इतिहासकारांची आक्षेप आहेत. रांके ने वस्तुनिष्ठ तेवर अवास्तव भर दिला त्यामुळे इतिहास लेखनात निरस्तता आणि रटाळपणा येतो. पूर्ण वस्तुनिष्ठता इतिहास लेखनात शक्य नाही. केवळ लिखित साधनांवर इतिहास लेखन म्हणजे अनेक महत्त्वाचे पैलू दुर्लक्षित राहतील कारण सामाजिक व सांस्कृतिक पैलू सोबतच अनेक पैलूंचे लिखित साधने उपलब्ध नसतात. रांके ची पूर्ण सत्याची भूमिका सुद्धा अनेक इतिहासकारांना मान्य नाही.

**मूल्यमापन:-**

रांके च्या प्रत्यक्षवादी विचारांवर काहींची आक्षेप असली तरी रांके चा शास्त्रीय पद्धतीचा आग्रह, स्त्रोत साधनांवर जोर, स्त्रोत साधनांची परीक्षण आणि सत्य दर्शन यांचा आग्रह या बाबी इतिहास लेखनाला देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. थोडक्यात प्रत्यक्षवादी इतिहास लेखन प्रवाहाने विषयाचे प्रस्तुतीकरण करताना आकर्षक भाषा, कलात्मक मांडणी आणि रंजकतेलाही महत्त्व द्यावे जेणेकरून इतिहास रूक्ष व रटाळवाना होणार नाही. वाचकांना त्यात गोडी निर्माण व्हायला हवी. आवड निर्माण व्हायला हवी.

**संदर्भ सुची**


१) शेख प्रा. गफूर," इतिहास लेखन शास्त्र" प्रीतम पब्लिकेशन,जळगाव प्र. आ. 2007 पृष्ठ क्रमांक 96- 97
२) कोठेकर डॉ. शांता," इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर प्र. आ. 2005 पृष्ठ क्रमांक 162
३) कित्ता, पृष्ठ क्रमांक 163
४) शेख प्रा. गफूर," इतिहास लेखन शास्त्र" प्रीतम पब्लिकेशन, जळगाव प्र. आ. 2007 पृष्ठ क्रमांक 97
५) खुराणा डॉ. के. एल. व बंसल डॉ. आर. के." इतिहास लेखन धारणाए,तथा पद्धतीया, लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा शष्टम संशोधित संस्मरण का पुनर्मुद्रण 2012 पृष्ठ क्रमांक 177
६) शेख प्रा. गफूर," इतिहास लेखन शास्त्र" प्रीतम पब्लिकेशन, जळगाव प्र. आ. 2007 पुष्ठ क्रमांक 98
७) कोठेकर डॉ. शांता," इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान"श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती 2005 पृष्ठ क्रमांक 167
८) सातभाई डॉ. श्रीनिवास," इतिहास लेखन शास्त्र" विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद सुधारित द्वितीय आवृत्ती जून 2015 पृष्ठ क्रमांक 200
९) सरदेसाई डॉ. बी. एन." इतिहास लेखन पद्धती" फडके प्रकाशन कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011 पृष्ठ क्रमांक 124
१०) खुराणा डॉ. के एल व बंसल डॉ. आर के," इतिहास लेखन धारणाए तथा पद्धतीया" लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा शष्टम संशोधित संस्मरण का पुनर्मुद्रण 2012 पुष्ठ क्रमांक 178
११) गायकवाड, सरदेसाई व हनमाने "इतिहास लेखन शास्त्र" फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती 1996 पृष्ठ क्रमांक 214
१२) राजदेरकर,सुहास " इतिहास लेखन शास्त्र" विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती 1998 पृष्ठ क्रमांक 152
१३) कोठेकर डॉ. शांता," इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती 2005 पृष्ठ क्रमांक 164